नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०९/२०२५ ( सोमवार )**

---

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता उमरेड पोलीसांनी काढला रूट मार्च

**पोलीस स्टेशन उमरेड :—** आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद—ए—मिलाद या सणोत्सवाचा बंदोबस्त असल्याने उमरेड पोलीसांनी सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक ०१/०९/२०२५ रोजी श्रीमती वृष्टी जैन, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांच्या उपस्थितीत रूट मार्च काढला. नमुद रूट पोलीस स्टेशन उमरेड ते भिसी नाका चौक ते इतवारी मार्केट ते जिवान विकास चौक ते पोलीस स्टेशन उमरेड पर्यत या मार्गाने घेण्यात आला. सदर रूटमार्च मध्ये पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड, यांच्यासह पोलीस स्टेशन उमरेड येथील ०६ अधिकारी, १ एस. आर. पी. एफ. पथक, १ आर. सी. पी. पथक, ५१ अंमलदार, ६५ गृहरक्षक हजर होते.






MAHARASHTRA POLICE

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ३१/०८/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पिपरी मच्छी मार्केट, साई रेस्टोरेन्ट कन्हान येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) राजेन्द्र उर्फ राजु कवडु बंड, वय ५० वर्ष, रा. तुकाराम नगर, कन्हान, २) लक्ष्मीकांत सदाशिव कारेमोरे, वय ४३ वर्ष, रा. स्वामी विवेकानंद नगर कन्हान, ३) अमीत योगराज छानीकर, वय ३६ वर्ष, रा. घाट रोहना कन्हान, ४) सादीक जाफर कशमीरी, वय ४५ वर्ष, रा. तारसा रोड, कन्हान, ५) रोशन रामु यादव, वय ३६ वर्ष, रा. गांधी चौक ,गवलीपुर कन्हान हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ३,७५०/— रूपये आणि दोन ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण २३,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे ४,५ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## उपविभागीय पोलीस अधिकारी,रामटेक यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ३१/०८/२०२५ रोजी श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की ,अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे त्यांनी उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, रामटेक येथील अंमलदार आणि रामटेक पोलीस स्टेशन चे अधिकारी तसेच अंमलदार यांना कारवाईचे आदेश दिले. पोलीसांनी मौजा मनसर ते माउली रोड येथे नाकाबंदी संशयीत आयशर वाहन क्रमांक एम एच २६ बी.ई. ८९२३ मिळुन आले वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये ११ म्हशी बाधुंन निर्दयते कोंबुन, दोरीने तोंड आणि बांधुन असलेल्या अवस्थेत वाहतुक करतांना मिळुन आले . **चालक विकास गजानन राठोड, वय २८ वर्ष,रा. अस्वलधरी तांडा, ता. उमरी, जि. नांदेड हा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष**

**आरोपीच्या ताब्यातुन एक आयशर वाहन क्रमांक एम एच २६ बी.ई. ८९२३ किंमती २०,००,०००/— रूपये. व ११ म्हशी किंमती ६,६०,००० /— रूपयाचा एकुण किंमती २६,६०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपी विरूध्द कलम ११( १) (ड) प्रा.छ. अधि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## उमरेड पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ३१/०८/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी गोकुल खदान पिराया शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पिकअप वाहन क्र. एम.एच. २८ बीबी ३८३१ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन चालकाला नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी नामे **अक्षय वसंता कुरूटकर, वय २६ वर्ष, रा. बेसुर, ता. भिवापूर** अशी माहीती समजली. सदर वाहन त्याचेच मालकीचे असल्याबाबत पोलीसांना माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १ गाय आणि १ वासरू असे गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावर खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून पिकअप वाहन क्र. एम.एच. २८ बीबी ३८३१ किंमती ४,००,०००/— रूपये. व गोवंश जनावरे किंमती १०,००० /— रूपयाचा एकुण किंमती ४,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला**

**नमुद आरोपी विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ३१/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०१/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री पराग पोटे , पोलीस उप अधिक्षक (गुह),नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सटवा माता नगर, छोटा पुलीया, झोपडपट्टी होळी चौक, येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार,जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. शिवाजी चौक, गांधी चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांना तपासण्यात आले.

सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्री पराग पोटे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले. सदर कारवाईत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकचे पोलीस अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने